Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# प्राथमिक स्तरावर 'आपल्या सभोवतालचे जग' या विषयाचे कृतीयुक्त आव्हानात्मक शिक्षण : शाश्वत विकासासाठी आधुनिक काळाची गरज

संशोधकाचे नाव
श्री. दत्तात्रय शिवाजी उगले
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
प्रा. डॉ. अर्चना पुंडलिकराव भोसले
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

*सारांश :*

*राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये आधुनिक काळानुसार शिक्षण पद्धतीबद्दल अपेक्षा व्यक्त केल्या असून त्याप्रमाणे राष्ट्रहितासाठी अपेक्षित बदलांसह अभ्यासक्रम रचना करण्याचे सुतोवाच केलेले आहे. त्याअन्वये राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) 2023 अंतर्गत प्राथमिक स्तरावर 'आपल्या सभोवतालचे जग' हा विषय विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून कृतीयुक्त शिक्षणातून, त्यांना शिकण्यामध्ये विविध आव्हाने देऊन अधिक नाविन्यपूर्ण, रंजक आणि सक्रियपणे विद्यार्थ्यांपर्यंत कसा पोहचवता येईल याबद्दल स्पष्ट केले आहे.संशोधकाने कृतीयुक्त शिक्षणातून आपल्या सभोवतालच्या जगाची ओळख या विषयाचा संकल्पनात्मक व विश्लेषणात्मक अभ्यास करून कृतीयुक्त – आव्हानात्मक शिक्षणाची गरज व महत्त्व, आपल्या सभोवतालचे जग या विषयाच्या शिक्षणाची सद्यस्थिती, आपल्या सभोवतालचे जग या विषयाचे आव्हानात्मक पद्धतीने शिक्षणाचे फायदे, शाश्वत विकास यावर शोधनिबंधातून प्रकाश टाकला आहे.*

CC BY Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**महत्त्वाचे शब्द :** आपल्या सभोवतालचे जग, कृतीयुक्त शिक्षण, आव्हानात्मक शिक्षण, शाश्वत विकास

## प्रस्तावना :

एकविसावे शतक हे तंत्रज्ञानाचे आणि प्रगतीचे आहे. एकविसाव्या शतकात मानवाने विविध क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे, त्याला शिक्षण क्षेत्रही अपवाद नाही. मात्र, त्याच बरोबर या माहिती तंत्रज्ञानाच्या आणि औद्योगिकीकरणाच्या युगात जागतिक स्तरावर पर्यावरणीय आव्हाने,

सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समस्या यांसारखे आव्हाने आहेत. या आव्हानांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर जागतिक शांतता आणि स्थैर्यासाठी मोठे संकट निर्माण झाले आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी आणि शाश्वत विकासासाठी आजच्या आधुनिक युगात शिक्षण ही काळाची गरज आहे, जी आपल्याला व्यक्ती म्हणून विकसित होण्यास त्याचबरोबर चांगले नागरिक बनण्यास मदत करते. शिक्षण हे एक महत्त्वाचे साधन आहे जे आपल्याला नवीन कौशल्ये आणि ज्ञानप्राप्तीसाठी मदत करते. त्यामुळे आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाला खूप महत्त्व आहे. आजच्या काळात शिक्षणाचा स्तर वाढवण्यासाठी अनेक नवनवीन पद्धती अवलंबल्या जातात. आधुनिक शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थी केंद्रस्थानी असतो. एकविसाव्या शतकातील या आधुनिक अध्यापन पद्धती विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी, त्यांचा कल यानुसार ठरतात. आधुनिक शिक्षण पद्धतींचा उद्देश विद्यार्थ्यांना आव्हानात्मक शिक्षण देऊन त्यांचा सर्वांगीण विकास साधने हे आहे. आधुनिक शिक्षण पद्धती अंतर्गत आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन हा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये आंतरविद्याशाखीय अध्ययन अध्यापनाचे महत्त्व, पर्यावरणीय आणि हवामानातील बदलामुळे निर्माण होणाऱ्या समस्या या दोन बाबींवर विशेष भर दिला आहे. आंतरविद्याशाखीय अभ्यासांतर्गत प्राथमिक स्तरावर आपल्या सभोवतालचे जग हा विषय विद्यार्थ्यांना त्यांचा स्थानिक परिसर, निसर्ग, समाज व संस्कृती यांचा एकत्रित कृतीयुक्त अभ्यास करण्यास प्रवृत्त करतो. तसेच या विषयातील विविध आव्हानात्मक कृती विद्यार्थ्यांना सर्जनशील व चिकित्सक विचार, निर्णयक्षमता, भावनिक समायोजन, ताणतणावाचे व्यवस्थापन करण्यास आणि नवनिर्मितीस चालना देण्यास प्रोत्साहन देतील. यासाठी कृतीयुक्त शिक्षण पद्धतीची आवश्यकता आहे. कृतीयुक्त शिक्षण ही एक प्रभावी व परिणामकारक अध्ययन अध्यापन पद्धती आहे. विद्यार्थ्यांना शिकण्यास आव्हाने दिल्याने ते पारंपारिक अध्ययन अध्यापन पद्धतीपेक्षा गतीने शिकतात. त्यामुळे आजच्या युगात आपल्याला शाश्वत विकासासाठी सभोवतालचे जगाचे शिक्षण हे कृतीयुक्त आणि आव्हानात्मक असणे अतिशय महत्त्वाचे आहे.

**गरज व महत्त्व :**

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात प्राथमिक स्तरावर आपल्या सभोवतालचे जग आणि कृतीयुक्त आव्हानात्मक शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शिक्षण हे केवळ अभ्यासक्रम–पाठ्यक्रम यापुरते मर्यादित नसून ते आपल्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेले एक व्यापक अनुभवाचे क्षेत्र असल्याचे लक्षात घेतले पाहिजे. आपल्या सभोवतालचे जग हा एक अत्यंत विस्तृत आणि रंजक विषय आहे. आपल्या सभोवतालचे जग हे आपल्याला विविध गोष्टी शिकण्यासाठी समृद्ध असा मंच आहे. आपल्या आजूबाजूला, परिसरात दिसणारी प्रत्येक गोष्ट, प्रत्येक घटना, प्रत्येक बदल या

सगळ्याचा समावेश आपल्या सभोवतालच्या जगात होतो. यातूनच आपल्याला नवनवीन गोष्टी शिकता येतात, अनुभव मिळवता येतात.

**गृहितके :**

1. प्राथमिक स्तरावर 'आपल्या सभोवतालचे जग' ही संकल्पना आंतरशाखीय दृष्टिकोनावर आधारित आहे.
2. कृतीयुक्त आणि आव्हानात्मक शिक्षण विद्यार्थ्याच्या शिकण्याच्या प्रक्रियेत सक्रिय सहभागासह शिकण्याची गती वाढवते.
3. कृतीयुक्त अध्ययन अध्यापनातून विद्यार्थ्याला विचार करण्याची, निरीक्षण करण्याची आणि त्याच्या समस्या स्वतः सोडवण्याची संधी मिळते.

**उद्दिष्टे :**

1. आपल्या सभोवतालचे जग या विषयाचे संकल्पना व महत्त्व स्पष्ट करणे.
2. प्राथमिक स्तरावर कृतीयुक्त आणि आव्हानात्मक शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करणे.
3. आधुनिक काळात शाश्वत विकासासाठी आपल्या सभोवतालच्या जगाचे या विषयाच्या अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी सविस्तर विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. प्रस्तुत शोधनिबंध हा गुणात्मक स्वरुपाचा असल्याने तो दुय्यम स्रोतांवर आधारित आहे. त्यामुळे करून विविध संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, नियतकालिकांमध्ये प्रकाशित शोधनिबंध, नियतकालिकांमध्ये प्रकाशित लेख, विविध संकेतस्थळे याद्वारे संकलित माहितीच्या आधारे शोध निबंधाच्या अभ्यासाची मांडणी करण्यात आली आहे.

**उद्दिष्टांनुसार विश्लेषण :**

**1) आपल्या सभोवतालचे जग या विषयाची संकल्पना व महत्त्व :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये येणाऱ्या काळात शिक्षण प्रक्रियेमध्ये सर्जनशीलता, चिकित्सक विचार, कल्पक विचार, कृत्रिम बुद्धिमत्ता, समग्र आरोग्य, परिसर आणि पर्यावरण शिक्षण, संस्कृती, जागतिक नागरिकत्व यासंबंधी विविध शालेय व सहशालेय उपक्रम हाती घेण्यात येतील असे नमूद केलेले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये आंतरविद्याशाखीय अध्ययन व त्याचे महत्त्व नमूद केलेले आहे. प्राथमिक स्तरावर परिसर अभ्यास, विज्ञान, भूगोल आणि पर्यावरण यासारख्या

विषयांचा समावेश आंतरविद्याशाखेत होतो. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, 2023 अन्वये प्रत्येक वयोगटानुसार सर्व विषयांतील आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन आणि निसर्गाशी समायोजन प्रस्तुत करताना पूर्व प्राथमिक स्तरामध्ये विद्यार्थ्यांच्या वास्तविक जगाशी संबंधित जग असल्यामुळे 'मूळ स्वरूपात' तर प्राथमिक स्तरांमध्ये 'आपल्या सभोवतालचे जग' म्हणून ओळख करून दिली आहे. जसजसे मुलाचे विश्व वाढते तसतसे मित्र,नातेवाईक,परिसर,शिक्षक, शाळा, समाज आणि संस्कृती यातून मूल्यांबद्दल अधिक माहिती मिळते. हेच विद्यार्थ्याचे सुरुवातीचे सभोवतालचे जग असते, त्याचे हे सभोवतालचे जग दैनंदिन अनुभवातून विस्तारत जाते.

प्राथमिक शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, मानसिक, शारीरिक आणि सामाजिक विकासाचा पाया आहे. शिक्षणाच्या या टप्प्यावर विद्यार्थ्यांचे सभोवतालचे जग समजून घेणे, त्यातील संकल्पना आणि घटनांचे आकलन होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. 'आपल्या सभोवतालचे जग' या विषयाच्या अंतर्गत विद्यार्थ्यांना त्यांच्या आजूबाजूच्या घटकांचा सखोल अभ्यास करणे, त्यांचा अनुभव घेणे, आणि त्यांच्यातील नातेसंबंध समजून घेणे यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

विद्यार्थी आपल्या आजूबाजूचे नैसर्गिक आणि सामाजिक वातावरणाचे निरीक्षण करत असतात. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार 'आपल्या सभोवतालचे जग' हा विषय विद्यार्थ्यांमधील नैसर्गिक जिज्ञासा वापरून त्यांची सभोवतालच्या नैसर्गिक आणि सामाजिक पर्यावरणासंबंधी पद्धतशीरपणे आकलन क्षमता विकसित करेल. आपल्या सभोवतालच्या जगाशी पुरेशी ओळख झाल्यावर क्रमाक्रमाने पर्यावरणाची विस्तार कक्षा वाढवण्याचा महत्त्वाचा दृष्टिकोन येथे असेल. आंतरविद्याशाखेचे दृष्टिकोनातून सभोवतालच्या पर्यावरणातील परस्पर संबंध करून विद्यार्थ्यांचा समग्र दृष्टिकोन विकास करण्यात येईल. ज्ञान, मूल्य आणि स्वभाव वृत्ती यांचा विकास परिसर, क्षेत्र, देश यांच्या माध्यमातून साधला जाईल. 'आपल्या सभोवतालचे जग' हा विषय त्यांचा परिसर, निसर्ग, समाज, संस्कृती यांचा सखोल अभ्यास करण्यास प्रवृत्त करतो. त्यातून विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता ही समस्या सोडवण्याचा कौशल्यांचा विकास, जिज्ञासूवृत्ती, सृजनशीलता आणि पर्यावरणीय जबाबदारीची भावना विकसित होते. या विषयांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्यासोबत जगाशी जोडून शिक्षण देणे अपेक्षित आहे. प्राथमिक स्तरावर खेळ, शोध आणि कृती आधारित अनुभवात्मक व आव्हानात्मक अध्ययन अध्यापन, अभ्यासक्रम शैलीचा विकासाचा समावेश असेल.

**2) प्राथमिक स्तरावर कृतीयुक्त आणि आव्हानात्मक शिक्षणाचे महत्त्व :**

**अ) कृतीयुक्त शिक्षणाचे महत्त्व :**

प्राथमिक स्तरावर शिकणे हे प्रयोग आणि कृतींवर आधारित असावे अशी अपेक्षा बऱ्याच शिक्षणतज्ज्ञांनी याअगोदर व्यक्त केलेली आहे. कृतीयुक्त शिक्षणाची संकल्पना या सामान्य कल्पनेत

रूजलेली आहे की, मुले माहितीचे निष्क्रिय प्राप्तकर्ते नसून सक्रिय शिकणारे असतात. जर मुलांना स्वतरूहून शिकण्याची, अनुभवण्याची, कृती करण्याची संधी दिली आणि योग्य शैक्षणिक वातावरण दिले तर शिक्षण आनंददायी होते त्याच बरोबर ते दीर्घकाळ टिकते. कृतीयुक्त शिक्षणामध्ये अध्ययनार्थ्यांना अनुभवांमध्ये सक्रियपणे सहभागी करून घेतले जाते. त्यामुळे अमूर्त संकल्पना, सिद्धांतांना प्रत्यक्ष कृती व निरीक्षणासह अनुभवण्याची संधी मिळते.

शैक्षणिक तत्त्वान्वये अध्ययनार्थ्याला विचार करण्याची, निरीक्षण करण्याची आणि त्याच्या समस्या स्वतरू सोडवण्याची संधी दिली तर शिक्षण हे मनोरंजक, सोपे आणि शाश्वत होते. एखादी व्यक्ती जितकी जास्त इंद्रियांना उत्तेजित करते तितके जास्त शिकते. त्यातून प्राप्त ज्ञान, कौशल्ये हे चिरकाल टिकते. हे एक अध्ययन केंद्रीत तंत्र आहे की जे विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतरूच्या क्षमता आणि कौशल्यांनुसार शिकण्यास प्रवृत्त करते. ते त्यांच्या स्वतःच्या अनुभवानुसार आणि समजेनुसार गोष्टींचा अर्थ लावतात आणि अंमलात आणतात. कृतीयुक्त अध्ययनामध्ये विद्यार्थी स्वयंअध्ययनातून ज्ञानाची निर्मिती करतो.

कृतीयुक्त शिक्षण अनुभवात्मक शिक्षणाची संधी प्रदान करतात. ज्यात प्राथमिक स्तरावर लहान वयातच मुले इतरांपेक्षा वेगळा विचार करणे, स्वतंत्र निर्णय घेणे,त्याची पडताळणी करणे या कौशल्यांचा विकास होतो. कृतीयुक्त शिक्षण हे श्ज्ञानरचनावादीश शिक्षण सिद्धांतावर आधारित आहे. या सिद्धांतानुसार प्रत्येक व्यक्ती शिकताना त्याच्या पूर्व अनुभवांचा आणि शिक्षणाचा सहसंबध, अन्वयार्थ लावतो आणि याच्या आधारे स्वतरूचे ज्ञान तयार करतो.त्यातूनच नवनिर्मिती होते. ज्ञानरचनावाद कृतीयुक्त शिक्षणाचे समर्थन करतो. प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांच्या परिसर अभ्यासातील विविध संकल्पना स्पष्ट होण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी कृतीयुक्त शिक्षणाची, विविध अध्ययन अनुभवांची मांडणी शिक्षकांनी करणे गरजेचे आहे.

कृतीयुक्त शिक्षणाचे महत्त्व पुढील प्रमाणे थोडक्यात विषद करता येईल.

- **चिरकाल ज्ञान :** जे ज्ञान आपण प्रत्यक्ष अनुभवातून घेतो ते आपल्या मनात दीर्घकाळ टिकते.
- **कौशल्य विकास :** कृतीयुक्त शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्ये विकसित होतात. उदा. संशोधन करणे, समस्या सोडवणे, चिकित्सक वृत्ती, संवाद साधणे इत्यादी.
- **अनुभवातून शिक्षण :** पुस्तकातील ज्ञान प्रत्यक्ष जीवनाशी जोडल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचा अर्थ अधिक चांगल्या प्रकारे समजतो.
- **आत्मविश्वास वृद्धी :** स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून विद्यार्थी नवीन गोष्टी शिकण्यास उत्सुक होतात.

- **समान संधी :** सर्वांना त्यांच्या क्षमतेनुसार शिकण्याची संधी मिळते.
- **नवनिर्मिती :** विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण विचार करून त्यातून नवनिर्मिती करण्याची आवड निर्माण होते.
- **तणावमुक्त शिक्षण :** कृतीयुक्त शिक्षणामुळे आनंदी, तणावमुक्त वातावरणात अध्ययन अध्यापन होते.
- **स्वयंअध्ययन :** यातून विद्यार्थ्यांला स्वयंअध्ययनाची सवय लागते.

**ब) आव्हानात्मक शिक्षणाचे महत्त्व :**

शिक्षण प्रक्रिया आनंददायी असणे अत्यंत गरजेचे असते. विद्यार्थ्यांना सतत नवनवीन शिकायला आवडते. यासाठी शिक्षकाने मुलांना स्वयं अध्ययनासाठी प्रेरित करणे गरजेचे असते. भविष्यवेधी शिक्षण पद्धती आणि एकविसाव्या शतकातील कौशल्यांचा विचार केल्यास मुलांना शिकण्यास आव्हान देणे अतिशय महत्वाचे आहे. मुलांना शिकण्यास आव्हान देणे याची सर्वसमावेशक व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येईल.

मुलांना शिकण्यास आव्हान देणे म्हणजे मुलांचे शिक्षण एकविसाव्या शतकातील कौशल्यांचा विकास करण्यासाठी, त्याची शिकण्याची गती वाढविण्यासाठी, अध्ययन अध्यापन प्रक्रियेत विविध कृती, उपक्रम व प्रश्नांद्वारे त्यांच्या विचारशक्तीला वाव देऊन त्यांना शिकण्यासाठी प्रोत्साहित करणे होय.

मुलांना नाविन्यपूर्ण गोष्टी सातत्याने आवडत असतात. त्यामुळे लहान मुले अशा गोष्टी पटकन शिकतात. म्हणून सातत्याने नवनवीन आणि नाविन्यपुर्ण आव्हाने देत राहणे गरजेचे आहे. मुलांना शिकण्याच्या गतीत आव्हाने कमालीची परिणामकारक ठरतात. मुलांना आव्हान स्वीकारायला आवडते. विद्यार्थ्यांना अशी वेगळी आव्हाने दिली गेली तर मुलांमध्ये एकमेकांमध्ये चुरस, स्पर्धा निर्माण होते आणि जिंकण्याच्या स्वाभाविक भावनांचा वापर शिकण्याचा प्रक्रियेत करता येतो. वरवर अशक्य आणि अवघड वाटणा—या बाबी सहजतेने होऊन जातात. भविष्यवेधी शिक्षण पद्धती आणि एकविसाव्या शतकातील कौशल्यांचा विचार केल्यास मुलांना शिकण्यास आव्हान देणे सध्याच्या तसेच येणाऱ्या काळात शिक्षण व्यवस्थेमध्ये महत्त्वाचे ठरणार आहे.

**3) आधुनिक काळात शाश्वत विकासासाठी आपल्या सभोवतालच्या जगाचे या विषयाच्या अभ्यासाचे महत्त्व :**

शाश्वत विकास म्हणजे भविष्याचा वेध घेऊन, भविष्याच्या गरजा लक्षात घेऊन, आजच्या परिस्थितीचा विचार करून त्याप्रमाणे विकासाचे नियोजन करणे होय.

विसाव्या शतकात उत्तरार्धात शाश्वत विकास ही संकल्पना उदयास आली. आर्थिक असंतुलन, सामाजिक समानता, पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन यामध्ये संतुलन राखण्यासाठी जगातील विविध राष्ट्रे संघर्ष करीत आहेत. भारतासारख्या लोकसंख्येचा विस्फोट असणाऱ्या देशांमध्ये विविध सामाजिक समस्यांसह पर्यावरणीय आव्हाने निर्माण झाली आहे. त्यामुळे शाश्वत विकास ही एक आधुनिक काळाची गरज निर्माण झाली आहे. आपले सभोवतालच्या जगाच्या अभ्यासामधून विद्यार्थ्यांमध्ये बालवयापासूनच पर्यावरणीय संरक्षण, संवर्धन आणि नवनिर्मिती विकसन करण्याची वृत्ती जोपासली जाईल, यामुळे शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करता येतील.

आधुनिक काळात औद्योगिकीकरणामुळे आणि वाढत्या लोकसंख्येमुळे विविध नैसर्गिक व मानवनिर्मित संसाधनाचा ऱ्हास, जैवविविधतेचे नुकसान, हवामान बदल, प्रदूषण यासारख्या वाढत्या पर्यावरणीय समस्या मुळे शाश्वत विकास ही सर्वात महत्त्वाची जागतिक गरज बनली आहे. त्यासाठी पर्यावरणीय अभ्यास म्हणजेच आपल्या सभोवतालच्या जगाचा अभ्यास आवश्यक आहे. शाश्वत विकासाची उद्दिष्टे, धोरणे तयार करण्यासाठी बहुविद्याशाखीय दृष्टिकोन अभ्यासणे गरजेचे आहे. ज्यामध्ये पर्यावरणशास्त्र, भूगोल, विज्ञान, संस्कृती, अर्थशास्त्र, सामाजिक विज्ञान यासारख्या विषयांचा समावेश होतो. नवीन राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यामध्ये या सर्व विषयांचा अंतर्भाव हा प्राथमिक स्तरासाठी 'आपले सभोवतालचे जग' यामध्ये करण्यात आला आहे.

शाश्वत विकासाची धोरणे व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी बालवयापासून विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक वृत्ती ही आव्हानात्मक शिक्षणातून निर्माण होऊ शकते. त्यामुळे आपले सभोवतालचे जग या विषया अंतर्गत आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन, पर्यावरणीय समस्यांचे आकलन, समस्यांचे निराकरण करण्यासाठी नावीन्यपूर्ण पद्धतीचे विकसन, संशोधनवृत्ती, जिज्ञासूवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यासाठी आपले सभोवतालचे जग या विषयाचा कृतीयुक्त पद्धतीने अध्ययन अध्यापन करणे गरजेचे आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना आपले सभोवतालचे जग या विषयी विविध आव्हाने देऊन शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यास हातभार लावता येईल.

**समारोप :**

प्राथमिक स्तरावर अभ्यासक्रमाचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कृतीयुक्त शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कृतीयुक्त शिक्षणातून आपल्या सभोवतालचे जग या विषयाच्या शिकण्याचे फायदे विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेत भर करणारे आहे. एकविसाव्या शतकातील आवश्यक विविध कौशल्ये प्राप्त करण्यासाठी तसेच समस्या सोडवण्यासाठी आपल्या सभोवतालचे जग ही संकल्पना समजणे आणि आव्हानात्मक पद्धतीने अभ्यासणे गरजेचे आहे. यातूनच शाश्वत विकासासाठी आवश्यक कौशल्ये विद्यार्थ्यांना अवगत होतील.आपण शाश्वत विकासाच्या माध्यमातून आपल्या

सभोवतालच्या जगाला आणि आपल्या भविष्याला सुरक्षित करू शकतो. यासाठी आपल्याला समस्यांचे आकलन करून त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची :**


1 राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद. (2005) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (2005)

2 भारत सरकार. (2021), राष्ट्रीय शिक्षण धोरण (2020).मानव संसाधन विकास मंत्रालय.

3 राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे (2023). अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन, वाचन साहित्य

4 राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे (2024).राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण